**CNR No :- MHSI100001982022**

**–: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४१/२०२२ :–**

**–: निशाणी २७ वरील आदेश :–**

प्रतिवादी क्र. ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुद्ध पारीत झालेला ''एकतर्फी'' आदेश रद्दबातल होण्यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. ५ चे म्हणणेनुसार, वादीने सदरचा दावा सरस निरस धडेवाटप होऊन पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ५ हा आजारी असल्याने त्यास दावा समन्स प्राप्त होऊनही तो न्यायालयात हजर राहीला नाही व त्यामुळे त्याच्या विरुद्ध एकतर्फी आदेश पारीत झाला. प्रतिवादी क्र. ५ याचा हजर होऊन कैफियत दाखल न करण्यामागे कोणताही गैरहेतु नव्हता. त्यास त्याची कैफियत व म्हणणे देण्याची संधी नाकारल्यास त्याचे पैशाचे स्वरुपात भरुन न येणारे असे नुकसान होणारे आहे. सबब प्रतिवादी क्र. ५ विरुद्ध पारीत झालेला एकतर्फी आदेश रद्दबातल होऊन मिळण्यासाठी प्रस्तुचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी वादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. वादीने अर्जाच्या पाठीमागे म्हणणे सादर करुन अर्ज मंजूर करण्यास तीव्र आक्षेप घेऊन, त्यामध्ये सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ असुन खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ यांना दावा समन्सची बजावणी होऊनही ते मे. न्यायालयासमोर हजर न झाल्याने त्यांच्या विरुद्ध दावा ''एकतर्फी'' चा आदेश दि.१२.०९.२०२३ रोजी पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्र. ५ ने सदरचा आदेश रद्दबातल करण्यासाठी दिलेले विलंबाचे आजारपणाचे कारणास्तव कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुत अर्जासोबत जोडलेले नाही व त्यामुळे ते संयुक्तीक व समाधानकारक नाही. न्यायालयाचा व परीणामी वादीचा अमुल्य वेळ प्रतिवादीच्या या कृत्यामुळे वाया गेलेला आहे. परंतु केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादी क्र. ५ यांना दाव्याकामी हजर करुन न घेणे हे नैसर्गीक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. ५ ची कैफियत अभिलेखावर दाखल झाल्यास दावा गुणदोषावर निकाल करणेस न्यायालयास मदतच होणार आहे. अर्ज नामंजूर झाल्यास अर्जाच्या अनुषंगाने करावी लागणारी कार्यवाहीची पुनरावृत्ती टाळणेसाठी, प्रतिवादी क्र. ५ चे विरुद्ध पारीत झालेला ''एकतर्फी'' आदेश खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करुन, न्यायाच्या कारणे अर्ज मंजूर करणे मला उचित वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. रक्कम रु.३००/–(रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र. २७ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र. ५ यांनी प्रस्तुत अर्जाकामी झालेली खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर त्यांच्या विरुद्ध दि.१२.०९.२०२३ रोजी पारीत झालेला दावा ''एकतर्फी'' चालविणेचा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. पुढील नेमली तारीख अगर तत्पुर्वी सदर आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADIP BAVKAR
Date: 2023.12.05 15:17:20 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – ०५.१२.२०२३. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)दोडामार्ग.